

दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे



वर्ष ६ ▪ अंक ५३ ▪ सोमवार २३ नोव्हेंबर २०२६ ▪ पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

पोलिसांचे जिल्ह्यात 'कोंबिंग ऑपरेशन'

अवैध धंदे आणि सराईत गुन्हेगारांवर धडक कारवाई



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारीवर वचक बसवण्यासाठी अहिल्यानगर पोलीस दलाने रविवारी (दि. २२) सायंकाळी जिल्ह्यात विशेष 'कोंबिंग ऑपरेशन' राबवले. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार दुपारी ३ ते रात्री १० या वेळेत ही धडक मोहीम राबवण्यात आली. यामध्ये अवैध धंदे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे आणि सराईत गुन्हेगारांची झाडाझडती घेत पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.

मोहिमेदरम्यान सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत कडक नाकाबंदी करून तब्बल बाराशे वाहनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या (ड्रंक अँड ड्राईव्ह) १२ जणांवर, तर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १८ वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. यासोबतच पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यासाठी हॉटेल व लॉजिंगची १५६ ठिकाणी कसून तपासणी केली.

फरार व पाहिजे असलेले आरोपी, तडीपार गुन्हेगार आणि रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांच्या राहत्या घरांची झडती घेण्यात आली. यामध्ये ५६ जणांवर अजामीनपात्र वॉरंट बजावण्यात आले, तर ४१ हद्दपार आणि ५७ सराईत गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. तसेच, जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर छापे टाकून २६ कारवाया करण्यात आल्या आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व सोमनाथ वाकचौरे, जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी आणि स्थानिक गुन्हे शाखा अशा ४६ पोलीस अधिकारी, २०२ पोलीस अंमलदार आणि ७४ होमगार्ड जवान यांनी या धडक मोहिमेत सहभाग घेतला.

१३० कोटींच्या थकीत देण्यांसह सण अग्रीमसाठी

महापालिका कर्मचाऱ्यांचे बेमुदत धरणे आंदोलन सुरू!

आयुक्त यशवंत डांगे यांच्यासोबतची बैठक निष्फळ; २३ नोव्हेंबरपासून आंदोलनाला सुरुवात । कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लागेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा कामगार युनियनचा इशारा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे दिवाळी सण अग्रीम तसेच सुमारे १३० कोटी रुपयांपेक्षा अधिक थकीत देणी तातडीने अदा करावीत, या मागणीसाठी अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने सोमवार (दि. २३ नोव्हेंबर) पासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या प्रश्नांबाबत कामगार युनियनने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर आयुक्तांसोबत बैठकही झाली; मात्र या बैठकीत कोणतीही सकारात्मक चर्चा न झाल्याने कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. या आंदोलनामुळे महापालिकेचे कामकाज ठप्प झाले आहे.

महाराष्ट्रातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये तसेच महानगरपालिकांमध्ये कर्मचाऱ्यांना दिवाळी सणापूर्वी सण अग्रीम दिले जाते. मात्र, अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाकडून यंदा दिवाळी सण होऊनही कर्मचाऱ्यांना अद्याप सण अग्रीम देण्यात आलेले नाही. याशिवाय कर्मचाऱ्यांची सुमारे १३० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम थकीत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रशासनाविरोधात मोठी नाराजी निर्माण झाली आहे.

महापालिकेचे कर्मचारी नियमित कामकाजाबरोबरच जनगणना, एसआयआर आणि निवडणुकीसारखी अतिरिक्त जबाबदारीही प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. महापालिका निवडणूक प्रक्रियेतही कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र, निवडणुकीच्या कामाचा मोबदला अद्याप महापालिका कर्मचाऱ्यांना मिळालेला नाही. दुसरीकडे, महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना निवडणुकीतील कामाचा मोबदला महापालिकेने दिला आहे. त्यामुळे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढत असल्याचे युनियनच्या वतीने सांगण्यात आले.

राज्य शासनाकडून मिळणारे अनुदान वेळेवर प्राप्त होत नसल्यास कर्मचाऱ्यांचे वेतनही वेळेवर होत नाही. एकीकडे कर्मचारी नियमित कामकाजासह अतिरिक्त जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्यांच्या हक्काची देणी आणि सण अग्रीम मिळत नसल्याने कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याची भावना युनियनने व्यक्त केली.

कामगार युनियनचे सचिव आनंदराव वायकर म्हणाले की, महापालिकेतील कर्मचारी प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत. नियमित कामकाजासोबतच जनगणना, एसआयआर आणि निवडणुकीची अतिरिक्त कामेही कर्मचारी करतात. मात्र, त्यांच्या हक्काची थकीत देणी आणि दिवाळी सण अग्रीम अद्याप मिळालेले नाही. महापालिकेत काही जण तुपाशी आणि कर्मचारी उपाशी, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. आयुक्त यशवंत डांगे यांच्यासोबत बैठक होऊनही सकारात्मक तोडगा निघालेला नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. जोपर्यंत कर्मचाऱ्यांचे ■ पान ४ वर

नेवासा आणि फाटा परिसरात अल्पवयीन मुलांना भाईगिरीचे वेड

दबंग कारवाईचा धसका घेतल्याने गुन्हेगारांची नवी शक्कल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

नेवासा– नेवासा शहर आणि नेवासा फाटा परिसरात सध्या अल्पवयीन मुलांमध्ये भाईगिरी आणि दहशत पसरवण्याचे वेड झपाट्याने वाढत असल्याचे गंभीर चित्र दिसून येत आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या डॅशिंग कार्यपद्धतीचा आणि दबंग कारवायांचा मोठा धसका घेतल्याने परिसरातील सराईत गुन्हेगारांनी प्रत्यक्ष गुन्हेगारीकडे पाठ फिरवली आहे. मात्र, कायद्याच्या कचाट्यातून वाचण्यासाठी या मोठ्या गुन्हेगारांनी आता नवी शक्कल लढवत कोवळ्या वयाच्या अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारी कृत्यांसाठी वापर करण्यास सुरुवात केल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. या वाढत्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, पोलिसांनी याकडे तातडीने लक्ष देण्याची आणि पालकांनीही आपल्या मुलांवर वचक ठेवण्याची गरज जाणकारांमधून व्यक्त होत आहे.

अल्पवयीन ■ पान ४ वर

पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचा इशारा



अल्पवयीन मुलांचा वापर करून त्यांना गुन्हेगारीकडे वळवणाऱ्यांचा शोध आम्ही लवकरच घेणार आहोत. पालकांनीही आपल्या मुलांकडे लक्ष द्यावे आणि त्यांना रात्री उशिरापर्यंत बाहेर राहू देऊ नये. आम्ही सोशल मीडियावर बारीक लक्ष ठेवून आहोत. अशा गुन्हेगारांना लवकरच धडा शिकवण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून, प्रत्येक हालचालीवर आमचा स्वतंत्र विभाग बारकाईने लक्ष ठेवून आहे. त्यामुळे मी सर्वांना आवाहन करतो की, कोणीही अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीसाठी वापर करू नये; असे आढळल्यास संबंधितांवर एमपीडीए आणि मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल.

एलसीबीचे जिल्ह्यात एकाच दिवशी नऊ छापे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने एकाच दिवसात जिल्ह्यातील विविध भागांत ९ ठिकाणी छापे टाकून अवैध दारू विक्री आणि जुगाराच्या अड्ड्यांवर कारवाई करत पोलिसांनी एकूण २ लाख २४ हजार ७०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत ९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी सहायक पोलीस निरीक्षक हरिष भोये, पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, विकास जाधव तसेच पोलीस अंमलदार अतुल लोटके, सोमनाथ झांबरे, अमोल आजबे, प्रकाश मांडगे, अरविंद भिंगारदिवे, ■ पान ४ वर

लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण करण्याचा निर्धार - पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे







दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– लोकतंत्र बचाव भीडतंत्र हटाव महारॅली हे कोणतेही शक्तीप्रदर्शन नाही.लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण करण्याचा हा निर्धार आहे.हा देश संसदेतून चालेल परदेशातून नाही.तुमच्या धाक दडपशाहीला देशातील जनता थारा देणार नाही असा इशारा जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने अहील्यानगर शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आलेल्या रॅलीचा समारोप दिल्लीगेट येथे जाहीथ सभेने करण्यात आला.सभापती प्रा.राम शिंदे आ.मोनिका राजळे आ.अक्षय कर्डीले भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुजय विखे पाटील उपमहापौर धनंजय जाधव भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग शहराचे अध्यक्ष अनिल मोहिते उतरचे नितीन दिनकर यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकरी कार्यकर्ते नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील यांनी कॉंग्रेस नेते राहूल गांधी यांच्यावर सडकून टिका केली.वर्षानुवर्ष देशात कॉंग्रेसची राजवट होती. पण त्यांना संविधान दिन साजरा करावासा वाटला नाही. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांनी देशात संविधान दिन साजरा करण्याचा निर्णय करून भारताच्या संविधाना प्रति असलेला आदर दाखवून दिल्याकडे लक्ष वेधून अहील्यानगर जिल्हा आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाते खूप वेगळे होते.त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीतून कॉंग्रेसला इशारा देतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की, हा देश संविधानाच्या आधाराने पुढे जाईल.. तुमच्या धाक दडपशाहीने नाही.

मागील काही दिवसात या देशामध्ये कॉंग्रेस आणि त्यांच्या काही मित्र पक्षांनी संविधानाच्या नावाखाली केवळ अराजक माजवून देशातील वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे.कॉंग्रेसच्या भूमीकेला आता कोणताही आधार राहीलेला नाही.ज्यांच्याकडे कोणताही विचार आता शिल्लक नाही.सातत्याने निवडणुकांमध्ये होत असलेल्या पराभवाने कॉग्सेस नेते हतबल झाले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मागील बारा वर्षात देशाने सर्वच क्षेत्रामध्ये केलेल्या प्रगतीमुळे भारत देश महासतेच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होत आहे.पण काही परदेशी शक्तीना हे पाहावत नाही.म्हणूनच परदेशी शक्तीच्या जोरावर देशाला बदनाम करण्याचे काम कॉंग्रेसकडून सातत्याने सुरू असल्याचा आरोप मंत्री विखे पाटील यांनी केला. संविधान हातात घेवून राहूल गांधी फिरत आहेत.पण देशातील जनता एवढी दूधखुळी नाही.संविधानाची आजपर्यत कॉंग्रेस पक्षाने कशी पायमल्ली केली हे देशाने चांगले ओळखले आहे. लोकसभेची मागील सर्व अधिवेशन आपण पाहीली. महत्वाच्या विषयावरील एकाही चर्चेत कॉंग्रेस पक्ष सहभागी झाला नाही. संविधानाच्या आधारे चर्चा करण्याची मानसिकता कॉंग्रेस नेत्यांची नाही. याचाअर्थ कॉंग्रेसचा विश्वास संविधान आणि संसदेवर नाही.या रॅलीतून आम्ही त्यांना इशारा देतो, जोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान आहे तोपर्यत लोकशाहीची लढाई संसदेतच होईल. मात्र रस्त्यावर लढण्याची वेळ आली तरी, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता यासाठी मागे हटणार नाही असा इशारा मंत्री विखे पाटील यांनी दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसीत भारत घडवायचा आहे. जिथे गरिबाला न्याय मिळेल, शेतकऱ्याला सन्मान मिळेल,युवकांना रोजगार मिळेल आणि प्रत्येक नागरिकाला विकासाच्या संधी मिळतील.राजकारणा पेक्षा राष्ट्रहित महत्वाचे आहे. संविधानाचा सन्मान करून लोकशाही संस्थांवरील विश्वास अधिक मजबुत करण्यासाठी आपल्या सर्वांना कटीबद्ध व्हावे लागणार असल्याचे मंत्री विखे यांनी शेवटी सांगितले.

सभापती प्रा.राम शिंदे यांनी आपल्या भाषणात अतिशय त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य लोकशाही मध्ये परावर्तित झाले आहे. निवडणुकांमध्ये पराभव होतो.लोकांना विचार पटत नाही तेव्हा विरोधी पक्ष म्हणून सुध्दा भूमिका करता आला पाहीजे.दुर्दैवाने देशात केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संविधानिक संस्थांची बदनामी करण्याचे काम सुरू आहे.जनतेचा कधीच विचार न केलेल्यांना चोख उतर देण्यसाठी ही रॅली असल्याचे सभापती शिंदे यांनी सांगितले.याप्रसंगी आ.मोनिका राजळे आ.अक्षय कर्डीले डॉ सुजय विखे पाटील यांची भाषण झाली.

दै. आकर्षण निवडक

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये शुक्रवारी किडनी विकार मोफत तपासणी शिबीर



अहिल्यानगर- जैन सोशल फेडरेशनद्वारे संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर येथे शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत किडनी विकार मोफत तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात किडनीच्या आजारांचे निदान, उपचार याबाबत मार्गदर्शन केले जाईल. अनुभवी नेफ्रोलॉजीस्ट डॉ. गोविंद कासट व फिजिशियन डॉ. प्राजक्ता पारधे शिबिरात रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत. अंगावर सूज येणे, लघवी कमी किंवा लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस विषयक उपचार केले जातील. महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत डायलेसिस मोफत करण्यात येईल. शिबिरात सोनोग्राफी, रक्त, लघवी इत्यादी तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जातील. आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये एम. आर. आय. २५०० रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. (संपर्क : मो. ९४०४२९७४११). डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ९५० रूपये (संपर्क : मो. ९४०५२७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये (संपर्क : मो.९४०४२९९९११), २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सॅम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सॅम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२.). मोफत बालरोग तपासणी शिबिराच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१- २३२०४७३/ ७४/७५ / ७६.

मराठा सोयरिक संस्थेच्या राहता, सिन्नर येथील मोफत मेळाव्यांचा लाभ घ्यावा.- अशोक कुटे

अहिल्यानगर- जगदंब फाउंडेशन संचलित मराठा सोयरीक संस्था व अखंड मराठा समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नगर जिल्ह्यात राहाता व नाशिक जिल्ह्यात सिन्नर येथे मोफत मराठा वधु वर परिचय मेळावा आयोजित केले असल्याची माहिती मराठा सोयरीक संस्थेचे अध्यक्ष अशोक कुटे व जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश शिवाजी लंघे यांनी दिली आहे. ११४ वा मोफत मेळावा राहाता तालुक्यात लोणी येथे वरद विनायक सांस्कृतिक भवन येथे रविवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केला आहे, तर ११५ वा मोफत मेळावा हा नाशिक जिल्ह्यातील सिन्नर शहरात मातोश्री नर्मदा लॉन्स येथे रविवार दिनांक ६ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या दोन्ही मेळाव्यांचा लाभ घेण्याचे आवाहन श्री.प्रकाश जोंधळे, राजाराम मुंगसे सर, जयश्री कुटे, श्री.सचिन निर्मळ, श्रीकांत बिडवे, श्री.सोमनाथ डोळे, श्री.नारायण जाधव, कमलेश कोते, सोमनाथ डोळे, डॉक्टर संजय उबाळे,श्री दत्ता गायकवाड,श्री.अनिल घोलप, श्री.भास्कररराव घुले, श्री.भाऊसाहेब सहाणे, श्री.सचिन आहेर, मराठासेवक मनोज सोनवणे, गोरक्षनाथ पटारे, अशोक गाडे, अनिताताई कोतकर, सागर मोरे यांनी आवाहन केले आहे. ज्यांची लग्न जमत नाही तेच मुलं वधू वर मेळाव्याला येतात हा गैरसमज आहे. गेल्या चार वर्षापासून अनेक उच्चशिक्षित वधु वर व पालक या मेळाव्याला येत असतात व अशा मेळाव्याच्या माध्यमातून व संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत ५००० पेक्षा जास्त लग्न मराठा सोयरीक संस्थेकडून जमलेले आहेत. त्यापैकी ५६७ लग्न विधवा, विधुर घटस्फोटीत यांची झालेली आहेत. ११३ मेळावे झालेले आहेत. धर्मादाय कार्यालयात जगदंब फाउंडेशन अंतर्गत मराठा सोयरीक संस्थेची अधिकृत नोंदणी केलेली आहे. त्यामुळे अविवाहित, विधवा, विदुर, घटस्फोटीत अशा सर्वच क्षेत्रातील विविध वधु वर पालकांनी या मेळाव्याला बायोडाटा सोबत घेऊन येणे गरजेचे आहे. मेळाव्याला आल्यानंतर अनेक जणांचे एकमेकांसोबत जुनी ओळख निघते नातंगोत निघते. त्यामुळे लग्न जमण्यास मदत होते. वेळेची व पैशांची बचत होते. हा मेळावा पूर्णपणे मोफत आहे. वधू वर पालकांना समोरासमोर स्थळे पाहून एकमेकांसोबत चर्चा करण्याची सुवर्णसंधी येथे मिळत असते. राहाता - लोणी येथील मेळाव्यास जिल्हा परिषद माजी अध्यक्षा मा.शालिनीताई विखे पाटील व वरद विनायक देवस्थानचे मठाधिपती ह भ प उद्धव महाराज मंडलिक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या संस्थेचे अहिल्यानगर, पुणे, नाशिक येथे संपर्क कार्यालय आहेत. अधिक माहितीसाठी ८४५३९०२२२२ वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

श्री साईबाबा मंदिर वर्धापन दिनानिमित्त पालखी मिरवणूक उत्साहात

नालेगावात साईनामाचा जयघोष; वर्धापन दिनानिमित्त चार दिवस धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नालेगाव येथील वाघगल्ली परिसरातील श्री साईबाबा मंदिराच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच द्वितीय तपपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित श्री साईबाबा पालखी मिरवणूक उत्साहात संपन्न झाली. श्रीराम मंदिर नवीपेठ येथून पालखी मिरवणुकीला प्रारंभ झाला. साईनामाचा जयघोष, भक्तिमय वातावरण आणि भाविकांच्या सहभागाने पालखी सोहळा भक्तिभावाने पार पडला.

ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री यांच्या कृपाशीर्वादाने व कै. पै. सुरेशराव शेळके यांच्या प्रेरणेने आयोजित या सोहळ्यात भाविकांनी पालखी मिरवणुकीत सहभागी होत साईबाबांच्या चरणी श्रद्धा व्यक्त केली. पालखी मिरवणुकीनंतर सायंकाळी ७.३० वाजता साई आरतीकरण्यात आली

यावेळी आयोजक नगरसेवक गणेश कवडे यांनी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पालखी सोहळ्याचे महत्त्व सांगितले. मंदिराच्या स्थापनेपासून सुरू असलेली धार्मिक परंपरा जपण्यासाठी आणि परिसरातील भाविकांना एकत्र आणण्यासाठी अशा उत्सवांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. साईबाबांच्या



विचारांचा प्रसार, भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकोपा वाढविण्याच्या उद्देशाने दरवर्षी वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. भाविकांनी धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन मंदिराच्या परंपरेला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता श्री संत नामदेव भजनी मंडळाचा कार्यक्रम आणि सायंकाळी ७ वाजता ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे कीर्तन होणार आहे. रविवार, २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता राधिका ग्रुपचे देवीचे भजन, तर सायंकाळी ७ वाजता ह.भ.प. अमोलजी महाराज गाडे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता वैष्णवी कुलकर्णी प्रस्तुत नृत्य साद डान्स अकॅडमीचा कथ्थक कार्यक्रम होणार असून, सायंकाळी ७ वाजता आचार्य ह.भ.प. हरिदासजी महाराज पालवे शास्त्री, आळंदी यांचे कीर्तन होईल. मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री (डोंगरगण) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी रात्री ८.३० वाजता आमदार संग्राम जगताप व गुरुवर्य अशोक महाराज जाधव यांच्या शुभहस्ते महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या वर्धापन दिन सोहळ्यात भाविकांनी सहभागी होऊन धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या कार्यक्रमासाठी ज्ञानेश योग आश्रम (डोंगरगण), ह.भ.प. भागवत महाराज जंगले, ह.भ.प. महेश महाराज मडके व श्री. ज्ञानेश्वर वाघ यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. नगरसेवक गणेश कवडे यांच्या पुढाकारातून कारंजा तरुण मंडळ, श्री साई प्रतिष्ठाण, वाघगल्ली व नालेगाव ग्रामस्थांच्या वतीने या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. वरील सर्व कार्यक्रम श्री साईबाबा मंदिर, वाघगल्ली, नालेगाव, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहे.

सारसनगर परिसराचा नियोजनबद्ध विकासकामांतून कायापालट – माजी महापौर भगवान फुलसौंदर

। यमुना नगरमध्ये रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन । आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून विकासकामांना गती



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहराचा नियोजनबद्ध आणि शाश्वत विकास साधण्यासाठी पुढील ३० वर्षांचा विचार करून आमदार संग्राम जगताप यांनी विविध क्षेत्रांतील विकासकामांना चालना दिली आहे. या माध्यमातून शहराच्या विकासाला दिशा मिळत असून, प्रभाग क्रमांक १४ मधील नगरसेवक नागरिकांची कामे फायर स्टेशनपेक्षाही जलद गतीने मार्गी लावतात. विकासकामांसोबतच नागरिकांना दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठीही सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. सारसनगर परिसराचा नियोजनबद्ध विकासकामांतून कायापालट झाला असून, त्यामुळे या परिसरात मोठ्या संख्येने नागरिक वास्तव्यास येत आहेत, असे प्रतिपादन माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी केले.

महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ मध्ये नगरसेवक प्रकाश भागानगरे यांच्या पाठपुराव्यातून आणि आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून यमुना नगर येथे रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, दिनेश जोशी, गोविंद महाराज हांडे, अभिषेक चिपाडे, बाबुलाल नागपुरे, गुलाब नढे, अमोल कदम, अक्षय गांधी, किरण देसाई, उमेश शिर्के, बाळासाहेब वाघ, प्रकाश गवांदे, गजानन गावंडे आदी उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक प्रकाश भागानगरे म्हणाले की, अहिल्यानगर शहरातील सारसनगर हे मोठे उपनगर म्हणून विकसित झाले आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला. त्यामुळे परिसरात नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे टप्प्याटप्प्याने हाती घेण्यात आली. सुरुवातीला जमिनीअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाइन, ड्रेनेजलाइन आदी मूलभूत सुविधांची कामे मार्गी लावण्यात आली. त्यानंतर डीपी रस्ते तसेच कॉलनीअंतर्गत रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे हाती घेण्यात आली. यातील बहुतांश कामे पूर्ण झाली असून, उर्वरित कामेही टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

याच परिसरात अरुणोदय क्रीडा संकुल उभारण्यात आले असून, या माध्यमातून खेळाडूंना आपल्या आवडीच्या खेळाचे प्रशिक्षण घेता येणार आहे. तसेच सरावासाठीही सुविधा उपलब्ध झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी दिनेश जोशी यांनी परिसरात झालेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. नागरिकांनीही विकासकामांचे स्वागत करून आमदार संग्राम जगताप आणि प्रभाग क्रमांक १४ मधील नगरसेवकांचे आभार मानले.

ऐतिहासिक बॉईज हायस्कूल व क्लेरा ब्रूस गर्ल्स हायस्कूलच्या संवर्धनासाठी माजी विद्यार्थ्यांचे स्वच्छता अभियान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शहरातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अहमदनगर बॉईज हायस्कूल आणि क्लेरा ब्रूस गर्ल्स हायस्कूलच्या संवर्धनासाठी रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. माजी समाजकल्याण अधिकारी तथा माजी विद्यार्थी श्री. रफिक मुन्शी यांच्या संकल्पनेतून, इतिहासप्रेमी पत्रकार भैरवनाथ वाकळे आणि प्राध्यापक व सामाजिक कार्यकर्ते सॅम्युअल वाघमारे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम आयोजित करून युगंधर प्रतिष्ठान, चे अध्यक्ष तसेच माझी नगरसेवक अजय चितळे यांच्या ३२० वा स्वच्छता अभियान दिन साजरा करण्यात आला.



अहिल्यानगर, माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदनगर बॉईज हायस्कूल येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये पास्टर सॅम्युअल नाईक, क्लेरा ब्रूस गर्ल्स स्कूलच्या शिक्षिका स्मिता नाईक, सुमित शिंदे, जाधव मॅडम, पातारे मॅडम, दीपाली कांबळे, सीमा जाधव, मार्टिन पारदे सर, अजय सूर्यवंशी सर आणि अभिजित वाघ सर यांच्यासह अनेक माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

आपल्या शाळेचे अस्तित्व टिकविण्यासोबतच तिचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी एकत्र येऊन प्रत्यक्ष कृतीतून योगदान देत आहेत, ही निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी बाब आहे. शाळेच्या संवर्धनासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष मैदानात उतरून काम करण्याचा संदेश या अभियानातून देण्यात आला.

या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी, सामाजिक कार्यकर्ते आणि सहकाऱ्यांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले. तसेच उपस्थितांसाठी चहापानाची उत्तम व्यवस्था केल्याबद्दल माजी विद्यार्थी सौ. सुरेखा शिंदे व प्रसन्न शिंदे यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. शाळा वाचविण्याची चळवळ आता चर्चेपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून पुढे जात असून, ऐतिहासिक शैक्षणिक वारसा जतन करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

अहिल्यानगर ही भारतातील स्त्री शिक्षणाची गंगोत्री, देशातील पहिल्या मुलींची शाळा आजही दुर्लक्षित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– येथील अमेरिकन मिशनरी मिस सिंथिया फॅरार यांनी भारतातील मुली आणि महिलांची पहिली शाळा तत्कालिन अहमदनगरमध्ये सुरू केली होती. तथापि क्रांतीज्योती सावित्रीबाई आणि महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याला प्रेरक ठरलेली देशातील शिक्षणाची गंगोत्री असलेली देशातील पहिली मुलींची शाळा आजही दुर्लक्षित असल्याची खंत भारताचे विविध देशांमधील माजी राजदूत आणि ५६ देशांचा समावेश असलेल्या कॉमेनवेल्थ संघटनेचे निवृत्त सेक्रेटरी जनरल कमलेश शर्मा यांनी व्यक्त केली.

शर्मा यांनी बुऱ्हाणनगर रस्त्यावरील ख्रिस्ती दफनभूमी येथे सावित्रीबाईंच्या शिक्षिका असलेल्या मिस् सिंथीया फॅरार यांच्या कबरीस भेट देऊन अभिवादन केले. शर्मा यांनी यावेळी अहिल्यानगरमधील इतिहासप्रेमी सामाजिक कार्यकर्त्यांशी संवाद केला. त्यांच्या समवेत मुंबईच्या प्रसिद्ध आर्की. किरण पत्की उपस्थित होत्या.

यावेळी शर्मा म्हणाले की, सिंथिया इज बिग हिरो इन एज्युकेशन असून त्यांनी तत्कालिन अहमदनगरमधे सुरू केलेली फॅरार शाळा म्हणजेच आत्ताची क्लेरा ब्रूस हायस्कूल ही बंद होण्याच्या मार्गावर आहे, असे ऐकतो. ही फार मोठी शोकांतिका आहे. ही शाळा बंद पडू नये ही आपली सर्वांची मागणी आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद प्रशासन यांनी सरकारचे प्रतिनिधी म्हणून लक्ष दिले पाहिजे. आपण पुढाकार घेऊन या शाळा



पुन्हा पुर्ववत सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा. भारतीय शिक्षणाचा संपन्न आणि समावेशक वारसा जपावा, अशी अपेक्षा शर्मा ज्यांनी व्यक्त केली. द्विजन्मशताब्दीचे महत्त्वपूर्ण औचित्य

शर्मा पुढे म्हणाले, फॅरार यांची शाळा असलेली क्लेरा ब्रूस हायस्कूल व बॉईज हायस्कूल यांचे रूपांतर शासनाच्या शिक्षण विभागाने आदर्श राष्ट्रीय शैक्षणिक संकुलात केले पाहिजे. शाळा बंद पडू न देता तिचे आपण पुनरुज्जीवन केले पाहिजे. एज्यूकेशन मॉडेल स्कूल केले पाहिजे. येथे वंचित घटक आणि मुलींसाठी दर्जेदार गुणवत्तायुक्त शिक्षणाचे नवनवे प्रयोग केले जातील, असे राष्ट्रीय शिक्षण केंद्र येथे उभारले जायला हवे. यंदाचे वर्ष हे केंद्र सरकार व राज्य सरकारने महात्मा जोतीराव फुले द्विजन्मशताब्दी वर्ष म्हणून विविध उपक्रमांनी साजरे करत आहे.

सत्ताधारी नेत्यांच्या अनधिकृत होर्डिंग्ज फ्लेक्स विरोधात आयुक्त शांत का? नितीन भुतारे यांचा सवाल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहरात अनधिकृत जाहिरात फलक, फ्लेक्स आणि होर्डिंग्ज हटविण्याबाबत महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव करण्यात आला असताना, शहरात आजही सत्ताधारी राजकीय नेत्यांचे आणि पदाधिकाऱ्यांचे अनधिकृत बोर्ड सर्रास झळकत आहेत. मग महानगरपालिकेचा ठराव नेमका कोणासाठी? सर्वसामान्य नागरिक आणि विरोधकांच्या बोर्डांवर आयुक्तांनी कारवाई करायची, तर सत्ताधाऱ्यांच्या बोर्डांकडे डोळेझाक का? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते नितीन भुतारे यांनी उपस्थित केला आहे.

यासंदर्भात त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे महानगरपालिका प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर तीव्र टीका केली आहे. महानगरपालिका क्षेत्रात अधिकृत परवानगी घेतलेले फ्लेक्स आणि जाहिरात फलक वगळता अन्य अनधिकृत बोर्ड हटविण्यात यावेत, तसेच संबंधितांवर कायदेशीर दंडात्मक कारवाई करावी, असा ठराव नुकत्याच झालेल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत करण्यात आला. विशेष म्हणजे, शहरातील अनधिकृत बोर्डांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी महानगरपालिकेत केली होती. त्यानंतर प्रशासनाने ठराव मंजूर करून कारवाईची भूमिका घेतली.

मात्र, ठरावाला काही दिवस उलटत नाहीत तोच शहरातील विविध चौक, रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी राजकीय नेत्यांचे, सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे तसेच विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने लावलेले फ्लेक्स आणि जाहिरात फलक मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचा ठराव केवळ कागदावरच राहिला आहे का, की त्याची अंमलबजावणी निवडक लोकांपुरतीच केली जात आहे, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे. नितीन भुतारे यांनी म्हटले आहे की, महानगरपालिकेने अनधिकृत बोर्ड हटविण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान असणे अपेक्षित आहे. शहरातील सामान्य नागरिक, व्यापारी किंवा राजकीय विरोधकांनी अनधिकृत फलक लावल्यास प्रशासन तातडीने कारवाई करते. मात्र, सत्ताधारी पक्षातील नेते आणि पदाधिकाऱ्यांचे बोर्ड शहरात लागलेले असतानाही प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याचे चित्र दिसत आहे. ही भूमिका प्रशासनाच्या आयुक्तांच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. शहरातील सार्वजनिक जागा या कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा नेत्याच्या वैयक्तिक मालकीच्या नाहीत. रस्ते, चौक, विद्युत खांब, सार्वजनिक भिंती आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होणाऱ्या ठिकाणी अनधिकृत जाहिरात फलक लावणे चुकीचे आहे. अशा फलकांमुळे शहराचे विद्रूपीकरण होत असून, वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे अनधिकृत बोर्डांवर कारवाई करताना राजकीय दबावाला बळी न पडता नियमांची समान अंमलबजावणी करावी, अशी मागणी भुतारे यांनी केली. महानगरपालिकेने ठराव केला, प्रशासनाने कारवाईची घोषणा केली, मग शहरात पुन्हा अनधिकृत बोर्ड लावणाऱ्यांना कोणाचा अभय आहे? ठराव करणारेच नियमांचे उल्लंघन करत असतील, तर नागरिकांनी प्रशासनाकडून न्यायाची अपेक्षा तरी कशी करावी? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शहरातील सर्व अनधिकृत फ्लेक्स, होर्डिंग्ज आणि जाहिरात फलक तातडीने हटवावेत, संबंधित बोर्ड लावणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अधिकृत परवानगी असलेल्या फलकांची यादी सार्वजनिक करावी आणि अनधिकृत बोर्ड लावणाऱ्या राजकीय व्यक्तींवरही कोणताही भेदभाव न करता कारवाई करावी, अशी मागणी नितीन भुतारे यांनी केली आहे. महानगरपालिकेचा ठराव हा केवळ सर्वसामान्यांना नियमांची जाणीव करून देण्यासाठी नसून, तो सत्ताधारी आणि प्रशासनालाही लागू आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा
फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

शेतकरी-आदिवासींच्या हक्कांसाठी लढणारे डॉ. अजित नवले यांना 'स्वराज्यसेनानी' किताबाची मानवंदना!



अहिल्यानगर- शेतकरी, आदिवासी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे झुंजार नेते कॉम्रेड डॉ. अजित नवले यांना पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने 'स्वराज्यसेनानी' या किताबाने सन्मानित करून मानवंदना देण्यात आली. लोकशाही मूल्यांचे रक्षण, संविधानाची प्रभावी अंमलबजावणी आणि सर्वसामान्यांच्या मूलभूत अधिकारांसाठी लढणाऱ्या आधुनिक काळातील लढवय्यांना स्वतंत्र ओळख व राष्ट्रीय प्रतिष्ठा मिळावी, या उद्देशाने 'स्वराज्यसेनानी' ही अभिनव लोकसन्मान संकल्पना पुढे आणण्यात आली आहे.कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत जनतेने दिलेल्या कौलानंतरही मागच्या दाराने सत्ता मिळविण्यासाठी काढण्यात आलेल्या अध्यादेशाच्या निषेधार्थ पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. याच आंदोलनांतर्गत अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारक परिसरात महाराष्ट्राच्या मंत्रालयाचे प्रतीकात्मक नामकरण 'शकुनी-तंत्रालय' असे करण्यात आले. लोकशाही आणि सहकार व्यवस्थेचे कथित वस्त्रहरण रोखण्यासाठी लोकशाहीच्या पुतळ्याला तिरंग्याची वस्त्रे नेसविण्यात आली. यावेळी लोकशाही आणि सहकार वाचविण्याचा संदेश देण्यात आला. या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, शाहीर कान्हू सुंबे, अशोक भोसले, पोपट भोसले, अभिमान शिंदे, राजू उमाप, प्रवीण शिंदे, सोहम शिंदे, चतुरा शिंदे, दिगंबर साबळे, दत्तात्रय साबळे, निकिता रणदिवे, गीतल उमाप, वैशाली पेटारे, सनी शिंदे आदी सहभागी झाले होते.स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या क्रांतिकारकांना आणि देशभक्तांना 'स्वातंत्र्यसेनानी' म्हणून ओळखले जाते. त्याच धर्तीवर स्वातंत्र्यानंतर देशात खऱ्या अर्थाने लोकशाही व्यवस्था रुजविण्यासाठी, संविधानातील मूलभूत अधिकार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध लढणाऱ्या व्यक्तींना 'स्वराज्यसेनानी' म्हणून राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळावी, अशी या संकल्पनेमागील भूमिका आहे.डॉ. अजित नवले यांनी शेतकरी चळवळीच्या माध्यमातून शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सातत्याने वाचा फोडली आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कष्टकरी कुटुंबांना न्याय मिळावा, त्यांच्या श्रमाला योग्य मोबदला मिळावा आणि शेती क्षेत्रातील समस्यांची प्रभावी सोडवणूक व्हावी, यासाठी त्यांनी विविध आंदोलनांच्या माध्यमातून संघर्ष केला आहे. तसेच पिढ्यान्पिढ्या वनजमिनीवर उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळाव्यात, वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी आणि आदिवासी समाजाला सन्मानाचे जीवन जगता यावे, यासाठीही त्यांनी सातत्याने लढा दिला आहे. त्यांच्या या संघर्षाची दखल घेऊन त्यांची 'स्वराज्यसेनानी' किताबासाठी निवड करण्यात आली.

माळकूप येथील त्या ग्रीन एनर्जी कंपनीच्या प्रदूषणाविरोधात अन्याय निवारण निर्मूलन सेवा समिती आक्रमक!

अहिल्यानगर - पारनेर तालुक्यातील माळकूप येथील एका ग्रीन एनर्जी कारखान्यातून बाहेर पडणारे रासायनिक व ॲसिडयुक्त सांडपाणी परिसरातील शेतजमिनी, जलस्रोत आणि नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत असल्याचा गंभीर तक्रार अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक अधिकारी नाशिक यांच्याकडे करण्यात आली आहे. कारखान्याकडून सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावली जात नसून, प्रतिबंधात्मक ई.टी.पी. यंत्रणेचा (सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा) प्रभावी वापर केला जात नसल्याचा दावा समितीने निवेदनाद्वारे केला आहे. या प्रकरणात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहिल्यानगर कार्यालयाकडून केवळ कागदोपत्री पाहणी करून दिशाभूल करणारे अहवाल तयार केले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची विभागीय स्तरावरून स्वतंत्र त्रयस्थ समिती नेमून प्रत्यक्ष तपासणी व सखोल चौकशी करावी, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केली आहे. येत्या १५ दिवसांत योग्य कार्यवाही न झाल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नाशिक येथील प्रादेशिक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

ऐतिहासिक वारशांच्या संवर्धन जागृतीची गरज : काजल जंजिरे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– इतिहास जतन करणे म्हणजे केवळ जुन्या वास्तूंचे संरक्षण करणे नव्हे, तर त्यांच्याशी संबंधित सत्य, स्मृती आणि सांस्कृतिक संदर्भ यांचेही जतन करणे होय. त्यासाठी ऐतिहासिक वारशांच्या संवर्धनाविषयी समाजात जागरूकता निर्माण होण्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन लेखिका व प्रसिद्ध वास्तुविशारद सौ. काजल महेश जंजिरे यांनी केले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याची साक्ष देणाऱ्या अहिल्यानगर जिल्ह्यातील पेडगाव (ता. श्रीगोंदा) येथील धर्मवीर गड या किल्ल्याबाबत सविस्तर माहिती असलेले पुस्तक पेडगावच्या रहिवासी असलेल्या लेखिका सौ. काजल महेश जंजिरे यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारले आहे. या माहितीपूर्ण पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आमदार विक्रमसिंह पाचपुते व आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते धर्मवीर गड किल्ला परिसरात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत नुकताच पार पडला. त्यावेळी लेखिका सौ. काजल जंजिरे बोलत होत्या.

आमदार पाचपुते यांच्या काष्टी गावची सुकन्या व आमदार ओगले यांच्या पेडगाव गावच्या स्नुषा असलेल्या सौ. काजल जंजिरे यांनी यावेळी पुस्तक निर्मिती प्रक्रियेचा पट उपस्थितांसमोर उलगडला. हे पुस्तक संभाजी महाराजांच्या शौर्याचे विविध पैलू व धर्मवीर गडाच्या ऐतिहासिक वारशाची माहिती नव्या पिढीसमोर बिंबविण्यासाठी एक सक्षम माध्यम व पर्याय आहे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. केंद्रीय राखीव पोलिस दलात सहाय्यक कमांडंट या पदावर कार्यरत असलेले पती महेश ईश्वर जंजिरे यांचा भक्कम पाठिंबा, प्रोत्साहन व विशेष योगदान तसेच सासू-सासरे व आई-वडिलांचा आशीर्वाद यामुळेच पुस्तक निर्मितीची प्रक्रिया लीलया पार पडली, असेही लेखिका काजल यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

आमदार पाचपुते व आमदार ओगले यांनी यावेळी लेखिका सौ. काजल जंजिरे यांचे तोंडभरून कौतुक केले. राज्यातील विधानसभा व विधान परिषदेच्या सर्व आमदारांपर्यंत गावच्या सूनबाई सौ. काजल यांनी शब्दबद्ध केलेल्या धर्मवीर गड या पुस्तकाच्या माध्यमातून संभाजी महाराजांचे शौर्य आणि पेडगावच्या धर्मवीर गडाचा इतिहास व महत्त्व या बाबी पोहोचविणार असल्याचे आमदार हेमंत ओगले यांनी स्पष्ट केले. आमदार पाचपुते यांनी काष्टी गावची लेक असलेल्या सौ. काजल या एक सिद्धहस्त लेखिका, चाणाक्ष आणि चतुर संशोधक आणि उत्कृष्ट वास्तुविशारद म्हणून अभिमान व गर्व असल्याचे सांगितले. त्यावर उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात पाचपुते यांच्या वक्तव्याला पाठिंबा व्यक्त केला. धर्मवीर गडाच्या संवर्धन व सुशोभीकरणासाठी भरीव निधी आणण्यासाठी आपण पुढाकार घेतलेला आहे, असेही पाचपुते म्हणाले.

ज्येष्ठ नेते ॲड. डी. डी. घोरपडे, इतिहासकार प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ, मसापचे विभागीय अध्यक्ष जयंत येलूलकर, कवी चंद्रकांत पालवे, नेत्रदूत जालिंदर बोरुडे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे, निवृत्त आयपीएस अधिकारी हेमंतराजे गायकवाड, पेडगावचे सरपंच इरफानभाई पिरजादे आदींची भाषणे झाली. गणराज प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या या पुस्तकाला वरिष्ठ पत्रकार व मुंबई हायकोर्टातील वकील डॉ. बाळासाहेब बोठेपाटील यांची प्रस्तावना आहे. गणराज चे संचालक प्रा. गणेश भगत, क्रिएटिव्ह कम्युनिकेशन्स चे संचालक व ज्येष्ठ संपादक जयंतराव देशपांडे आणि गणेश मुद्रणालयाचे संचालक गणेशसेठ दळवी यांचे या पुस्तकाच्या निर्मितीसाठी वेळोवेळी सहकार्य मिळाल्याचे लेखिका काजल जंजिरे यांनी नमूद केले.

ॲड. डॉ. बाळासाहेब बोठेपाटील यांनी प्रास्ताविक केले. लेखिका काजल जंजिरे यांचे सासरे ईश्वर जंजिरे, सासू सुनीता जंजिरे, वडील सुनील दरेकर, आई अश्विनी दरेकर, सामाजिक कार्यकर्ते सुरेश जंजिरे व युवा नेते महेश दरेकर यांनी स्वागत केले. पत्रकार विशाल चव्हाण यांनी आपल्या खास खुमासदार शैलीत कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. गणेश भगत यांनी आभार मानले. राज्यातील विविध क्षेत्रातील मंडळी तसेच महेश जंजिरे यांचे स्नेही असलेले विविध खात्यांमधील राज्यभरातील अधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी धर्मवीर गडाच्या सुमारे ९० एकर क्षेत्रातील वास्तू, मंदिरे व ऐतिहासिक वारशाची पाहणी करून माहिती घेण्याची संधी साधली.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन सुजयदादा विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जलतारा प्रकल्पाचा शुभारंभ

गणपती फाटा, कान्हुर – पारनेर रोड येथे २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन तसेच मा. खासदार मा. श्री. सुजयदादा विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आणि भाजप राज्य परिषद सदस्य मा.श्री.विश्वनाथ दादा कोरडे यांच्या संकल्पनेतून सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमाची जोड देत जलतारा प्रकल्पांतर्गत जलतारा खड्डे घेण्याचा शुभारंभ करण्यात येणार आहे. हा सोहळा मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता गणपती फाटा, कान्हुर - पारनेर रोड येथे आमदार मा.श्री.काशिनाथ दाते सर व महायुतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी टिकवणे, पावसाच्या पाण्याचे संवर्धन करणे आणि शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्याच्या उद्देशाने जलतारा प्रकल्पाची उभारणी हाती घेण्यात आली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर जलसंधारणाच्या कामांना मोठी गती मिळणार असून परिसरातील नागरिक, शेतकरी आणि युवकांचा सहभाग यामध्ये असणार आहे.

या शुभारंभ सोहळ्यासाठी परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी बांधव, सहकारी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मा. श्री.वसंतराव चेडे, मा.श्री.राहुल शिंदे पाटील, मा.श्री. अरुणराव ठाणगे, मा.श्री दिनेशराव बाबर, मा.श्री.शिवाजी काका खिलारी, महायुती पारनेर तालुका, भाजपा पारनेर तालुका व मा.श्री.विश्वनाथ दादा कोरडे युवा मंच यांच्या वतीने करण्यात आले आहे.

चैतन्य गोरक्षनाथ गडावर भाविकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करू -आयुक्त डांगे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– येथील गर्भगिरीच्या डोंगरावर चैतन्य गोरक्षनाथ महाराज प्रकट दिनानिमित्त भाविकांनी मोठ्या प्रमाणावर नाथांच्या समाधी चे दर्शन घेतले यावेळी अलख निरंजन आदेश चैतन्य गोरक्षनाथ महाराज की जय. या आवाजाने संपूर्ण परिसर दुम दुमुन गेला होता भाविकांची दर्शनासाठी सकाळपासूनच लांब पर्यंत रांग लागलेली दिसून येत होती

गडावर नाथ मंदिरासह खंडोबा मंदिर महादेव मंदिर व भैरवनाथ मंदिरही आहे. त्याचप्रमाणे तपश्चर्या मंदिर देखील आहे. यातूनच भुयारी मार्ग असल्याची माहिती मिळाली दुपारी बाराची आरती महापालिकेचे आयुक्त श्री डांगे यांच्या हस्ते झाली याचवेळी नाथ चरित्रावर. ज्ञानाई वारकरी शिक्षण संस्था वांबोरी येथील शंतनू महाराज लांबे यांचे मंत्रमुग्ध करणारे कीर्तन पार पडले.

देवस्थानचे अध्यक्ष ॲडव्होकेट शंकरराव कदम यांनी देवस्थानच्या विकास कामाबरोबर आयुक्त डांगे यांना पिंपळगाव माळवी येथील तलावातून गडावर पाणी आणण्यासाठी विहिरीला जागा द्यावी. यासाठी प्रस्ताव मांडला सत्काराला उत्तर देताना श्री डांगे यांनी विहिरीला जागा देण्याचे कबूल करून पाईपलाईन द्वारे गडावर पाणी आणून गडावरील पाण्याचे दुर्भिक्ष संपुष्टात येऊ शकते याची ग्वाही दिली. श्री डांगे यांच्या हस्ते देवस्थानने सुरू केलेल्या माहितीपर वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले. गडावरील गोशाळेत सध्या दीडशेपेक्षा जास्त गायी व वासरे असून दुष्काळी परिस्थितीत चाऱ्याचे मोठं संकट उभ आहे

गडावर जाण्यासाठी डांबरी रोड ची चांगली सोय झालेली आहे यामुळे भाविकांना थेट वरपर्यंत गाड्या घेऊन जाता येत आहेत. गडावर गोशाळा भक्तनिवास गेस्ट हाऊसची कामे झालेली दिसून येत आहेत

सर्व भाविकांसाठी अहिल्यानगर नालेगाव येथील नाथयोगी मित्र मंडळातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. वांबोरी येथील रोटरी ब्लड बँक यांना अनेक भाविकांनी रक्तदानही केले.

मी ज्ञानी होणार या नवोपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजली

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ यांनी मी ज्ञानी होणार हा नवोपक्रम जून २०२६ पासून राबविला.विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी, त्यांचे ज्ञान अद्यावत राहण्यासाठी, विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षेचा (शिष्यवृत्ती, नवोदय) पाया भक्कम करण्यासाठी,विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती विकसित होण्यासाठी, विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वृद्धिंगत होण्यासाठी आणि राष्ट्रहितासाठी विविध मूल्ये त्यांच्यामध्ये रुजण्यासाठी हा नवोपक्रम सुनील अडसूळ यांनी जून २०२६ पासून ते ऑक्टोबर २०२६ पर्यंत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी यशस्वीपणे राबविला.या नवोपक्रमात विविध लहान लहान उपक्रम त्यांनी राबविले.

या उपक्रमात दररोज परिपाठात सामान्य ज्ञानावर आधारित पाच प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले.या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञानावर आधारित पुस्तके वाचनासाठी विविध प्रकारची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. यासाठी शिक्षक सुनिल अडसूळ यांनी आठवड्यातून एक दिवस



वाचनासाठी पुस्तके देऊन यामध्ये विविध प्रकारच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवून त्यांना वाचनासाठी त्यांच्या आवडीची पुस्तके उपलब्ध करून दिली.आज सोशल मिडियाच्या काळात वाचन संस्कृती कमी होताना दिसत आहे. वाचन संस्कृती विकसित होणे ही काळाची गरज आहे.या नवोपक्रमात विद्यार्थ्यांनी दररोज कोणता भाग वाचावा याबाबत शिक्षक सुनिल अडसूळ यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले.वाचनातून आपल्याला आनंद आणि ज्ञान कसे मिळते हे समजावून सांगितले.विद्यार्थ्यांनी आनंदाने यावर आधारित विविध पुस्तकांचे वाचन केले.

विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी त्यांना घरीही वाचनासाठी विविध प्रकारची पुस्तके देण्यात आली.पुस्तक देवघेव रजिस्टरमधे पुस्तकांच्या नोंदी घेण्यात आल्या.वाचलेल्या पुस्तकावर सारांश रूपाने माहिती सांगून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी दिली.काही प्रश्नांबाबत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून माहिती दिली. या नवोपक्रमुळे विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती विकसित झाली.पुस्तके वाचनाबरोबर विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान अद्यावत राहण्यासाठी विविध प्रकारची वर्तमानपत्रेही त्यांना वाचनासाठी उपलब्ध करून दिली.विद्यार्थी मधल्या सुट्टीत या विविध वर्तमान पत्रांचे वाचन करतात.त्यामुळे वर्तमानपत्रातील विविध बातम्या विद्यार्थी सांगू लागले.त्यांना विविध घडामोडी समजल्या . कोणते योग्य आणि कोणते अयोग्य आहे याबाबतचे ज्ञान त्यांना समजले.वाचनामुळे त्यांना स्पर्धा परीक्षेचा पाया भक्कम करण्यासाठी मोठी मदत झाली.स्पर्धा परीक्षेसाठी विविध प्रकारच्या पुस्तकांचे वाचन केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती विकसित झाली.त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रहिताची विविध मूल्ये रुजली.त्यामुळे हा नवोपक्रम विद्यार्थ्यांसाठी अतिशय मार्गदर्शक , उपयुक्त ठरला आहे.या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इष्ट परिवर्तन झाले. त्यामुळे पालकांनी उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ यांचे विशेष अभिनंदन केले.

अखिल भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन बार्शी येथे कथालेखक बाळासाहेब देशमुख सन्मानित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



अहिल्यानगर– अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे वे२० अखिल भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन बार्शी येथे, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे रविवार दिनांक २२ नोव्हेंबर २६ रोजी संपन्न झाले. संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक रंगकर्मी फुलचंद नागटिळक हे होते. याप्रसंगी साहित्य संमेलन आयोजक, परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय डॉक्टर शरद गोरे होते.

या संमेलनमध्ये बाळासाहेब देशमुख यांनी शिकवण ही रचना सादर केली . दुष्काळग्रस्त परिस्थिती असताना, नाजूक परिस्थिती असताना, ग्रामीण भागातील आई-वडील म्हणणारे लोक, किती धीरोदात्तपणे संकटे झेलत असतात. आणि परिस्थितीशी दोन हात करत , जगण्याचा मूलमंत्र आपणास बहाल करत असतात. यावर भाष्य करणारी रचना त्यांनी सादर केली. संमेलनाध्यक्ष फुलचंद नागटिळक, राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर शरद गोरे यांच्या शुभहस्ते कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना ट्रॉफी, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

बाळासाहेब देशमुख यांचे आजवर रंग माझा वेगळा, माणसे अशी अन् तशीही.., माणसे भिंगातून मोसाइक हे चार कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचा लवकरच बोबडे बोल अन् विचार खोल.. हा चिमुकल्या, छोट्या मुलांच्या भावविश्वावर भाष्य करणारा बालकथा संग्रह प्रसिद्धीच्या वाटेवर आहे.. बाळासाहेब देशमुख यांच्या या साहित्यिक सन्मानाबद्दल ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पालवे, दिलीप कापसे, संदीप रासकर, रूपचंद शिदोरे , ज्येष्ठ कवयित्री सौ.भावना भावठणकर, अमोल कुंभार यांनी अभिनंदन केले आहे.

अंधत्वाकडून आत्मनिर्भरतेकडे;राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राला १० गुंठे जागेची ऐतिहासिक भेट

डॉ.प्रकाश कांकरिया यांच्या ७१ व्या वाढदिवसा निमित्त भूमीपूजन व अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात; अंध बांधवांच्या पुनर्वसनासाठी मोठे पाऊल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र संचलित डॉ.सुधा प्रकाश कांकरिया अंध बंधू-भगिनी कल्याण व पुनर्वसन प्रकल्प अंतर्गत ''अंधत्वाकडून आत्मनिर्भरतेकडे'' या संकल्पनेला साकार रूप देणारा भूमीपूजन समारंभ तसेच ज्येष्ठ समाजसेवक नेत्रतज्ञ डॉ. प्रकाश कन्हैय्यालाल कांकरिया यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड.सचिन भोजने होते. यावेळी डॉ. प्रकाश कन्हैय्यालाल कांकरिया व डॉ. सुधाताई कांकरिया यांनी राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राच्या पुनर्वसन प्रकल्पासाठी १० गुंठे जागेचे उदार दान जाहीर करून अंध बांधवांच्या सक्षमीकरणासाठी मोलाचे योगदान दिले. या निर्णयाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रकाश कन्हैय्यालाल कांकरिया, डॉ. सुधाताई कांकरिया, ॲड. सचिन भोजने, राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राचे अध्यक्ष भोजराज पाटील, महासचिव दत्तात्रय जाधव, कार्यकारिणी सदस्य प्रदीप लोंढे, पुणे विभागाचे शिवाजी लोंढे, महासचिव जनार्धन कोळसे, अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर (काका), गोरख दरंदले, अनिल चाबुकस्वार, राजेंद्र फळके, राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र विभाग शाखा नाशिकचे अध्यक्ष विनोद कांबळे, दिव्यदृष्टी दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष कृष्ण तवले, उपाध्यक्ष संजय गांधी, श्रीकांत माचवे, मंगेश रक्ताटे यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने दृष्टीहीन बंधू-भगिनी उपस्थित होते.

यावेळी समाजसेवक स्वप्निल ढवण यांनी अंध दिव्यांग बांधवांसाठी अन्नदान, अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला.

कार्यक्रमादरम्यान डॉ. प्रकाश कांकरिया यांचा ७१ वा वाढदिवस केक कापून आनंदोत्सवात साजरा करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना निरोगी, दीर्घायुषी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राचे महासचिव दत्तात्रय जाधव यांनी अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर यांना रुपये ११,००० ची आर्थिक मदत सुपूर्द केली. तसेच राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र या संस्थेला साई सूर्य दृष्टी सेवा जीवन गौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमात सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि दिव्यांग बांधवांना आत्मनिर्भर बनविण्याचा दृढ संकल्प यांचे प्रेरणादायी दर्शन घडले. पुनर्वसन प्रकल्पासाठी मिळालेली १० गुंठे जागा ही अंध बांधवांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नवी आशा निर्माण करणारी ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली

उद्याचा अहिल्यानगरचा हिरो नीलेश लंकेच!

प्रस्थापितांना आव्हान देणारे लंके हे राज्याच्या राजकारणातील नवे नेतृत्व । नगरचे राजकीय समीकरण लंके यांच्याभोवती फिरले पाहिजे । प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे यांचे गौरवोद्गार









दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत जिल्ह्यातील सर्व प्रस्थापित नेते एका बाजूला असताना त्यांना आव्हान देत खासदार नीलेश लंके यांनी मिळविलेला विजय हा केवळ एका जागेचा विजय नसून सामान्य कार्यकर्त्याच्या नेतृत्वक्षमतेचा प्रत्यय आहे. आजच्या राजकारणात नव्या नेतृत्वाला रोखण्यासाठी प्रस्थापित एकत्र येतात; मात्र अशा परिस्थितीत नीलेश लंके यांच्यासारखे नेतृत्व पुढे येत आहे. उद्याच्या राजकीय समीकरणांमध्ये नीलेश लंके यांना विचारल्याशिवाय कोणतेही समीकरण होऊ नये. नगरचे राजकारण लंके यांच्याभोवती फिरले पाहिजे आणि उद्याचा नीलेश लंके हा अहिल्यानगरचा हिरो झाला पाहिजे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे यांनी खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाचे जाहीर कौतुक केले.

यावेळी खासदार भास्कर भगरे, खासदार राजाभाऊ वाजे, माजी खासदार सदाशिव लोखंडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सिताराम काकडे व संदीप वर्पे, बाबासाहेब भोस, हर्षदा काकडे, सुधीर म्हस्के, शिव व्याख्याता यशवंत गोसावी, दिलीप सातपुते, योगीराज गाडे, योगिता राजळे, अर्चना गायकवाड, पंडित कांबळे यांच्यासह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल खासदार नीलेश लंके यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नीलेश लंके प्रतिष्ठान आणि आपला मावळा सामाजिक संघटना यांच्या वतीने अहिल्यानगर येथील सहकार सभागृहात नागरी सत्कार करण्यात आला. प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे यांच्या हस्ते हा सत्कार झाला. यावेळी शिंदे यांनी आपल्या भाषणातून लंके यांच्या संघर्षमय राजकीय वाटचालीचा गौरव करत त्यांना जिल्ह्याच्या भविष्यातील राजकारणाचे केंद्रबिंदू बनविण्याचे आवाहन केले.

शिंदे म्हणाले, सहकार आपल्या ताब्यात राहावा यासाठी ज्या प्रकारे बोली लावली जाते, ते आकडे ऐकल्यानंतर सामान्य माणूस ही निवडणूक जिंकू शकतो का, असा प्रश्न पडतो. अशा परिस्थितीत पारनेरच्या मतदारांनी एका सामान्य कार्यकर्त्याला नीलेश लंके यांच्या रूपाने जिल्ह्याच्या नव्हे, तर राज्याच्या नेतृत्वापर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांच्या विजयाचा मला विशेष अभिमान वाटतो. राज्यभरातील जिल्हा बँकांच्या निवडणुकांमध्ये प्रस्थापितांना आव्हान देऊन निवडून आलेले एकमेव नाव म्हणून नीलेश लंके यांची चर्चा झाली. अनेक मातब्बर नेत्यांच्या जिल्ह्यात सामान्य घरातील मुलगा आमदार होतो, खासदार होतो आणि प्रस्थापितांना आव्हान देतो, ही साधी गोष्ट नाही. नीलेश लंके हे संघर्षातून पुढे आलेले नेतृत्व आहे. लहान कामांतून स्वतःची धमक दाखविणारे नेते असतात, त्यामध्ये लंके यांचा समावेश होतो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

आजच्या राजकारणात एखादे नवे नेतृत्व उभे राहत असेल तर त्याला रोखण्यासाठी अनेकजण एकत्र येतात. हे नेतृत्व मोठे झाले तर भविष्यात आपल्याला आव्हान निर्माण होईल, या भीतीने पक्ष आणि विचार बाजूला ठेवूनही लोक एकत्र येतात. मात्र, अशा परिस्थितीतच सामान्य जनतेतून नवे नेतृत्व पुढे येत असते. अहिल्यानगर जिल्ह्यात सहकार, शिक्षण आणि कारखानदारीच्या माध्यमातून अनेक नेते तयार झाले. त्यांनी जिल्ह्यासाठी योगदान दिले आहे. त्यांचा अनादर करण्याचा प्रश्न नाही. परंतु आज सामान्य माणसासाठी कोण उभे राहणार, हा प्रश्न निर्माण झाला असताना पारनेरचे मतदार अभिमानाने नीलेश लंके यांच्या पाठीशी उभे राहिले आहेत. त्यामुळे या नेतृत्वाला पुढे नेण्याची जबाबदारी सर्वांची आहे, असे शिंदे म्हणाले.

नीलेश लंके यांनी आमदारकीची मुदत संपण्यापूर्वीच राजीनामा देऊन खासदारकीची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या मनात प्रस्थापितांना पराभूत करण्याची जिद्द होती. अन्याय झाला की त्याविरोधात मैदानात उतरायचे, ही छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा त्यांच्या कार्यातून दिसते. लंके हे केवळ राजकारणी नाहीत, तर मावळा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते, करामती व्यक्तिमत्त्व आणि कलाकारही आहेत, अशा शब्दांत शिंदे यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले.

खा. लंके यांच्या नेतृत्वाखाली गड-किल्ले संवर्धन आणि स्वच्छता मोहिमा राबविल्या जातात. या मोहिमांमध्ये सहभागी होताना त्यांच्या कामातील गनिमी कावा अनेकदा लक्षात येतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याच्या माध्यमातून इतिहास घडविला. त्याच पद्धतीने लंके यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत विरोधकांची मते फोडत २४ मतांनी विजय मिळविला. त्यांची लोकप्रियता ही सहजासहजी मिळणारी नाही. कोरोना काळात त्यांनी केलेल्या कामाची दखल ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही घेतली होती, असे शिंदे म्हणाले.

राजकारणात चांगली माणसे दुर्मीळ झाली आहेत. अशा परिस्थितीत गरीब, तरुण, शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी लढणारे नेतृत्व उभे राहिले तर त्याला चालना देणे आवश्यक आहे. जिल्हा बँकेची निवडणूक हे त्यासाठी निमित्त ठरले आहे. आतापर्यंतच्या निवडणुकांमध्ये लंके यांना जनतेची साथ मिळाली आणि त्यातूनच त्यांचे नेतृत्व मोठे झाले आहे. पारनेर सोसायटीच्या मतदारांनी जशी साथ दिली, तशीच साथ जिल्ह्यातील इतरांनीही द्यावी. भविष्यातील राजकीय समीकरणांमध्ये एका व्यक्तीला विचारल्याशिवाय कोणतेही समीकरण पूर्ण होऊ नये आणि ते नाव नीलेश लंके असावे, अशी भूमिका सर्वांनी घेतली पाहिजे. नगरचे राजकारण लंके यांच्याभोवती फिरले पाहिजे. उद्याचा नीलेश लंके हा अहिल्यानगरचा हिरो झाला पाहिजे, हीच माझी अपेक्षा आहे, असे आवाहन शिंदे यांनी केले.

सत्कार समारंभापूर्वी प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे, खासदार नीलेश लंके आणि पदाधिकाऱ्यांनी जेऊर येथे जाऊन दुष्काळी परिस्थितीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची भेट घेतली. त्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांना दिलासा दिला. विशेष म्हणजे, शेतकऱ्यांच्या बांधावरच शिंदे, लंके आणि पदाधिकाऱ्यांनी वनभोजन केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी जोडलेले नेतृत्व म्हणून लंके यांच्या कार्याचा उल्लेख करत शिंदे यांनी त्यांच्या आगामी राजकीय वाटचालीला बळ देण्याचे आवाहन केले.

जिल्हा बँकेच्या एका जागेवरील विजयाच्या निमित्ताने शशीकांत शिंदे यांनी खासदार नीलेश लंके यांना केवळ विजयी संचालक म्हणून नव्हे, तर अहिल्यानगर जिल्ह्याच्या आगामी राजकारणातील संभाव्य केंद्रबिंदू म्हणून पुढे आणण्याची भूमिका मांडली. त्यामुळे हा सत्कार सोहळा लंके यांच्या राजकीय नेतृत्वाच्या नव्या पर्वाची नांदी ठरणार का, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

पारनेरच्या पाणीप्रश्नावर राष्ट्रवादीचा हंडा मोर्चा; महिलांचा नगरपंचायतीसमोर ठिय्या

१२-१२ दिवस पाणी मिळत नसल्याने महिलांचा संताप; मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पारनेर– पारनेर शहरातील अनियमित पाणीपुरवठा, दूषित पाणी आणि बंद पथदिव्यांच्या प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पारनेर शहर शाखेच्या वतीने सोमवारी (दि. २३) नगरपंचायतीवर धडक हंडा मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात शहरातील असंख्य महिला हातात हंडे घेऊन नगरपंचायत कार्यालयासमोर ठिय्या देत बसल्या होत्या. महिलांनी पाणीप्रश्नाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाचे लक्ष वेधले. मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

शहरात तब्बल १२-१२ दिवसांनंतर पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. चार लाख लिटर पाणी मंजूर असतानाही प्रत्यक्षात केवळ दीड लाख लिटर पाणी मिळत असल्याचा आरोप करण्यात आला. काही भागांत दूषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असून वाडी-वस्त्यांवरील पाणीटंचाईही कायम आहे. याशिवाय अनेक भागांतील पथदिवे बंद असल्याने विशेषतः बिबट्याचा वावर असलेल्या परिसरात नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या आंदोलनात राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वसंत चेडे, नगरसेवक पै. युवराज पठारे, सामाजिक कार्यकर्त्या सुनिताताई सोबले, महिला तालुकाप्रमुख सुषमाताई रावडे, शंकर नगरे, अशोक चेडे, सहदेव कुलट, कांतीलाल ठाणगे, कविता औटी, अपर्णा खामकर, करण औटी, कल्याण थोरात, सुभाष औटी, ज्ञानेश्वर औटी, विठ्ठल कावरे, शकुंतला ठाणगे, शिवाजी जाधव, नियाज राजे, भाऊ औटी यांच्यासह कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रशासनाने पाणीप्रश्न गांभीर्याने घ्यावा – पै. युवराज पठारे

पारनेर शहरातील नागरिकांना पाण्यासाठी १२-१२ दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. नागरिकांना नियमित व स्वच्छ पाणी मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. मंजूर पाणी आणि प्रत्यक्ष मिळणारे पाणी यातील तफावत दूर करून प्रशासनाने तातडीने योग्य नियोजन करावे. अन्यथा नागरिकांच्या प्रश्नांसाठी आंदोलन अधिक तीव्र केले जाईल.

महिलांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी संघर्ष सुरूच ठेवणार – सोबले

शहरातील महिलांना पाण्यासाठी दररोज मोठी कसरत करावी लागत आहे. दूषित पाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून महिलांचा संयम आता संपला आहे. हंडा घेऊन नगरपंचायतीसमोर बसण्याची वेळ महिलांवर येणे ही दुर्दैवी बाब आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून महिलांना दिलासा द्यावा, अन्यथा आंदोलन सुरूच राहील.

घोसपुरीत दुहेरी देशसेवा बजावणाऱ्या माजी सैनिकांचा सत्कार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सैन्य दलातून निवृत्त झाल्यानंतर पुन्हा महाराष्ट्र शासनाच्या सरळ सेवेतून निवड होऊन कर्तव्यावर रुजू झालेल्या दुहेरी देशसेवा करणाऱ्या माजी सैनिकांचा सत्कार सोहळा घोसपुरी (ता.नगर) येथे आयोजित करण्यात आला होता.

श्री पद्मावती आजी-माजी सैनिक सेवा संस्था व श्री पद्मावती आजी-माजी सैनिक संघटना, घोसपुरी यांच्या वतीने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सत्कार सोहळ्यात माजी सैनिक बाळासाहेब गुलाब घोडके, संतोष सूर्यभान झरेकर, सुभाष उत्तम झरेकर, मिठू दशरथ झरेकर, सतीश बाबासाहेब वाळके, जालिंदर सावजी निमसे आणि तात्याराम सुखदेव लांडगे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.



आधी भारतीय सैन्य दलात सेवा देऊन निवृत्त झाल्यानंतर आणि त्यानंतर शासनाच्या सेवेत पुन्हा कार्यरत राहून दुहेरी जबाबदारी पार पाडणाऱ्या या मान्यवरांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा सोहळा ठेवण्यात आला होता. घोसपुरी येथील सैनिक भवन येथे झालेल्या या सत्कार सोहळ्यास श्री पद्मावती आजी-माजी सैनिक सेवा संस्था व श्री पद्मावती आजी-माजी सैनिक संघटना, घोसपुरी यांचे पदाधिकारी, सदस्य तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. या निमित्ताने तरुण पिढीला प्रेरणा मिळावी त्यांच्या मनात देशसेवेची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

बॉक्सिंग खेळाडूंना केले सन्मानित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– नुकत्याच सांगली येथे वरिष्ठ वयोगटाच्या पुरुष व महिला यांच्या महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेने राज्यस्तरीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा २०२६ आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्हा संघाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करिता एक सुवर्ण व दोन कांस्यपदकज पटकाविले व अहिल्यानगर जिल्हा संघाचे नाव लौकिक केले त्याबद्दल नगर शहराचे आमदार मा.श्री. संग्रामभैय्या अरुण काका जगताप यांनी आज रोजी विजयी खेळाडू कु.खुशी दिपक जाधव (सुवर्णपदक विजेती) तसेच कु.प्रियांका थोरात कास्य पदक योसेफ नेटके कास्यपदक या खेळाडूंना नगर शहराचे आमदार मा.,श्री संग्राम भैय्या अरुणकाका जगताप यांनी त्यांच्या कार्यालयात सत्कार करून सन्मानित केले व पुढील राष्ट्रीय स्पर्धे करता शुभेच्छा दिल्या त्यावेळी शहर बॉक्सिंग संघटनेचे उपाध्यक्ष सुंतीलालजी कोठारी मा.श्री माणिक विधाते सर अहिल्यानगर जिल्हा कुस्ती संघटनेचे कार्यालयीन सचिव श्री मदने सर तसेच अहिल्यानगर शहर बॉक्सिंग संघटनेचे सचिव व मार्गदर्शक शकील अहमद शेख नगर बॉक्सिंग अकॅडमी चे प्रशिक्षक नाझीम शेख अहिल्यानगर जिल्हा बॉक्सिंग समन्वयक डॉक्टर दीपक जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.



(पान १ वरून)

महापालिका कर्मचाऱ्यांचे बेमुदत धरणे आंदोलन सुरू!

सर्व प्रश्न मार्गी लागत नाहीत, तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील, असा इशारा वायकर यांनी दिला.

या आंदोलनावेळी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, सरचिटणीस आनंदराव वायकर, कार्याध्यक्ष नंदकुमार नेमाने, महादेव कोतकर, अजय सौदे, उपाध्यक्ष अमोल लहारे, सतीश ताठे, बैजू साठे, बाळासाहेब व्यापारी यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केल्यामुळे महापालिकेच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला असून कामकाज ठप्प झाले आहे.

दबंग कारवाईचा धसका घेतल्याने गुन्हेगारांची नवी शक्कल

मुलांवर गुन्हे दाखल झाल्यास त्यांना कायद्यानुसार मिळणाऱ्या सवलतींचा फायदा घेत, हे सराईत गुन्हेगार स्वतः पडद्यामागे राहून या मुलांच्या खांद्यावर बंदूक ठेवत आहेत. सोशल मीडियावर शस्त्रांचे प्रदर्शन करणे, वाढदिवसाच्या नावाखाली रस्त्यावर हुल्लडबाजी करणे, तसेच किरकोळ वादातून हाणामाऱ्या करणे असे प्रकार नेवासा आणि नेवासा फाटा परिसरात वाढले आहेत. झटपट प्रसिद्धी आणि पैशांच्या आमिषाला बळी पडून अनेक शालेय व महाविद्यालयीन मुले गुन्हेगारीच्या दलदलीत अडकत चालली आहेत.

गुप्त विभागामार्फत सूत्रधारांचा शोध घेण्याची मागणी

अल्पवयीन मुलांच्या या कृत्यांमागे नक्की कोणाचा हात आहे आणि कोणता भाई त्यांना बळ देत आहे, याचा पोलीस खात्यातील गुप्त विभागामार्फत (इंटेलिजन्स) सखोल तपास करून माहिती काढावी, असे मत जागरूक नागरिकांनी व्यक्त केले आहे. केवळ अल्पवयीन मुलांवर कारवाई न करता, त्यांना गुन्हेगारीकडे वळवणाऱ्या या पडद्यामागच्या सूत्रधारांनाच मुख्य आरोपी केले पाहिजे, अशी ठाम मागणी होत आहे. तसेच, दबंग कारवाईच्या भीतीने भूमिगत झालेल्या किंवा शांत बसलेल्या सराईत गुन्हेगारांची पोलीस विभागाकडून पुन्हा एकदा तातडीने ओळख परेड घेऊन त्यांना कडक शब्दांत तंबी द्यावी, जेणेकरून त्यांच्या या नव्या शक्कललाही आळा बसेल, असेही मत जाणकारांनी मांडले आहे. हा प्रकार वेळीच रोखला नाही, तर भविष्यात या परिसरात गंभीर गुन्हेगारीचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने आता पुन्हा एकदा ॲक्शन मोडवर येऊन मुख्य सूत्रधारांच्या मुसक्या आवळाव्यात आणि पालकांनीही आपल्या मुलांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नागरिक आणि जाणकारांच्या प्रमुख मागण्या

सूत्रधारांना मुख्य आरोपी करा: गुप्त विभागामार्फत माहिती काढून अल्पवयीन मुलांना वापरणाऱ्या मोठ्या भाईनाच गुन्ह्यात मुख्य आरोपी करावे. सराईत गुन्हेगारांची ओळख परेड: परिसरातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची पोलीस ठाण्यात ओळख परेड घेऊन त्यांना कायद्याचा धाक दाखवावा आणि कडक तंबी द्यावी.पालकांची दक्षता: आपली मुले कोणाच्या संगतीत आहेत, रात्री उशिरापर्यंत कुठे असतात आणि त्यांच्याकडे पैसे कोठून येतात, याकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

एलसीबीचे जिल्ह्यात एकाच दिवशी नऊ छापे

योगेश भिंगारदिवे, गणेश धोत्रे, निळकंठ कारखेले, अभिजीत अरकल, किशोर शिरसाठ, बाळासाहेब खेडकर, रोहित येमुल, योगेश कर्डीले, अरुण मोरे, शामसुंदर जाधव, अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे, दीपक जाधव, भगवान धुळे, रमीजराजा आत्तार, रिचर्ड गायकवाड, राहुल डोके, भगवान थोरात आणि सुनिल मालणकर यांची पाच विशेष पथके तयार केली. या पथकांना अवैध व्यावसायिकांची गोपनीय माहिती काढून कारवाई करण्याच्या सूचना व मार्गदर्शन करून रवाना करण्यात आले होते.

रविवारी, २२ नोव्हेंबर रोजी या पथकांनी पारनेर, कोतवाली, पाथर्डी, श्रीगोंदा आणि श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत जुगार व अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरोधात एकाच वेळी धडक मोहीम राबवली. यामध्ये पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू विक्रीप्रकरणी १ गुन्हा दाखल करून १४ हजार १६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू विक्रीचा १ गुन्हा आणि जुगाराचा १ गुन्हा असे दोन गुन्हे दाखल केले. पाथर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू विक्रीप्रकरणी सर्वाधिक ३ गुन्हे दाखल करून १४ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच श्रीगोंदा येथे अवैध दारू विक्रीप्रकरणी १ गुन्ह्यात १ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या मोहिमेतील सर्वात मोठी कारवाई श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाली असून, तेथे अवैध दारू विक्रीचा १ गुन्हा आणि जुगाराचा १ गुन्हा दाखल करत जुगाराच्या अड्ड्यावरून १ लाख ८१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.